**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** कोतवाली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0306 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/04/2025 03:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 02/04/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/04/2025
**Time From (वेळेपासून):** 15:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/04/2025 **Time (वेळ):** 03:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/04/2025 03:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** हॉटेल रयल येथे,अहिंसा चौक अहिल्यानगर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राहुल शिवनाथ व्यवहारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | काटवणखंडोबा, स्टेशनरोड, ,अहिल्यानगर ,कोतवाली,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | काटवणखंडोबा, स्टेशनरोड, ,अहिल्यानगर ,कोतवाली,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822773720

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मकरंद गोरखनाथ हिंगे | | | 1. वाळुंज पो बाबुर्डी घुमट, , अहिल्यानगर ,कोतवाली, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 25000/ रुपये त्यात 500 | 25,000.00 |

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद ला.प्र.वि,अहिल्यानगर
दि.03/04/2025

मी राहुल शिवनाथ व्यवहारे वय- 39 वर्षे, धंदा- ठेकेदारी, रा. काटवण खंडोबा, स्टेशन रोड, ता.जि.अहिल्यानगर मो.नं. 9822773720.

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाषी असुन मी दि.02/04/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती छाया देवरे,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना ला.प्र.वि.कार्यालयात समक्ष भेटुन मला एका लोकसेवक यांचेकरीता लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि श्रीमती देवरे यांनी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार उपलब्ध करुन घेतले. सदरचे पंच साक्षीदार ला.प्र. वि. कार्यालयात हजर झाले. त्यावेळी पोनि श्रीमती देवरे यांनी त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टाफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यावेळी पोनि श्रीमती छाया देवरे यांनी मला पंचासमक्ष माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासोबत राहण्यास आहे. मी बालाजी फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स मजूर सहकारी संस्था, अहिल्यानगर चा अधिकृत सभासद असून सदर संस्थेमार्फत तसेच माझे नातेवाईक ठेकेदारामार्फत सुमारे सहा वर्षापासुन अहिल्यानगर जिल्हयातील ग्रामपंचायतींच्या हददीतील रस्ते बांधकाम तसेच विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे कामे करत आहे.दि.07/03/2024 रोजी मी सभासद असलेल्या बालाजी फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स मजूर सहकारी संस्थेच्या नावे वाळुंज ग्रामपंचायत, ता. जि. अहिल्यानगर हददीतील खाकीपीर बाबा दर्गा व मस्जिदच्या आवारातील पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांच्यामार्फतीने मिळाले होते. संस्थेच्या वतीने सदरचे काम मी करायचे ठरल्याने ते मी अंदाज सहा महिन्यांपुर्वीच पुर्ण केले आहे. सदर कामासाठी आमच्या संस्थेच्या नावाने, केलेल्या कामाचा खर्च म्हणून 9,99,888/-रूपयेचे बील मंजूर होवून मिळण्यासाठी वाळुंज ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती पार्वती गोरखनाथ हिंगे यांची ताबा पावतीवर सही मिळण्यासाठी त्यांची भेट घेण्यासाठी गेलो असता त्यांचा मुलगा मकरंद गोरखनाथ हिंगे यांची भेट झाली. त्यांनी सदर कामासाठी एक लाख रूपये लागतील असे मला सांगीतल्याने माझे लक्षात आले की, माझे कामाचे बील मंजूर होणेसाठी ताबा पावतीवर सही देण्याच्या मोबदल्यात मकरंद गोरखनाथ हिंगे हे त्यांची आई सरपंच श्रीमती पार्वती गोरखनाथ हिंगे यांचेसाठी माझेकडे लाचेची मागणी करीत आहेत. त्यावेळी मी त्यांना सरपंच श्रीमती पार्वती गोरखनाथ हिंगे यांची भेट घेण्याबाबत विनंती केली असता,श्री.मकरंद हिंगे यांनी सांगितले की, त्यांची आई वयोवृध्द व सतत आजारी असल्याने त्यांचे सर्व कामे तेच बघत असल्याचे सांगितले. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. आज मी मकरंद गोरखनाथ हिंगे यांची अहिल्यानगर येथे माझे कामाच्या संदर्भाने भेट घेणार आहे. वगैरे मजकुराची तक्रार सांगितली. मी सांगितलेली तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास पोनि.श्रीमती देवरे मॅडम यांनी मला सांगितले.त्यावरुन मी माझ्या स्वहस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन दिली त्यावर मी,दोन्ही पंचांनी व पोनि.श्रीमती देवरे मॅडम यांनी स्वाक्षरी केली.

त्यांनतर पुढील कारवाई अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी जावुन करण्याचे ठरले.त्यावेळी मी माझे गाडीने व पोनि श्रीमती देवरे,दोन पंच व सापळा पथक त्यांचेकडील वाहनाने अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी आले. त्यावेळी मी त्यांच्या वाहनामध्ये बसलो. त्यावेळी माझ्या तक्रारीवरुन श्री. मकरंद गोरक्षनाथ हिंगे हे माझ्या वरील

कामासाठी माझ्याकडे पुन्हा लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे सुचनेवरुन पोना मोरे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले.त्यानंतर पोना मोरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व श्री. मकरंद हिंगे यांची भेट घेण्यासाठी मला, पंच क्र.1 यांना माझ्या कडील चारचाकी वाहनाने 15.58 वा. सुमारास रवाना केले.
त्यानुसार आंम्ही स्वास्तीक चौक येथे गेलो असता श्री.मकरंद हिंगे यांचा माझे मोबाईलवर फोन करुन तुम्ही हॉटेल रॉयल येथे या असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही हॉटेल रॉयल येथे जावुन श्री. हिंगे यांची भेट घेतली. सदर भेटी दरम्यान आमचेत संस्थेचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी श्री. हिंगे यांनी माझेकडे मी केलेल्या कामाचे बिल काढणेसाठी 50,000/- रुपयाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना एवढे पैसे नाहीत असे म्हणालो असता त्यांनी 45,000/- रुपये दया असे म्हणुन तडजोडीअंती माझेकडे 45,000/- रुपयाची मागणी केली. त्यावेळी आता माझेकडे 25000/- रुपये आहेत जमन का? आता कुठे तरी नांदुन घ्या असे म्हणालो त्यावर श्री. हिंगे यांनी नांदतो, नांदायला काय आहे असे म्हणुन 25,000/- रुपये लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावेळी मी आता माझेकडे पैसे नाहीत. ऑफीसमध्ये पैसे असल्याचे सांगितले. त्यावेळी मी माझे मित्रास फोन करुन पैसे घेवुन येण्यास सांगितले असता त्यांनी त्यांचेकडे गाडी नसल्याचे सांगितले.त्यावेळी श्री. हिंगे यांनी मी ऑफीसला येतो असे म्हणाले. त्यावेळी मी व पंच नं.1 असे माझेकडील चारचाकी वाहनाने व श्री. हिंगे त्यांचे कडील चारचाकी वाहनातुन आमचे पाठीमागे आमचे ऑफीसला आलो. त्यावेळी हिंगे हे ऑफीसच्या समोर बाहेर रोडवर त्यांचे वाहनात थांबुन राहीले. मी व पंच नं.1 असे वाहनातुन उतरुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 16.47 वा. सुमारास आलो. त्यावेळी पोना मोरे यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर घेवुन तो बंद केला.सदर बाबत मी व पंच क्र.1 अषांनी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना माहिती दिली, तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले.त्यावरुन श्री.मकरंद हिंगे यांनी आमच्या संस्थेच्या नावाने, केलेल्या कामाचा खर्च 9,99,888/-रुपयाचे बील मंजूर होवून मिळण्यासाठी वाळुंज ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती पार्वती गोरखनाथ हिंगे यांची ताबा पावतीवर सही करुन देण्याच्या मोबदल्यात 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 45,000/- रुपये लाच मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे आता 25000/-रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले.
त्यानंतर श्री मकरंद हिंगे यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत पोकॉ सुदुक यांनी मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे सुचनेवरुन श्री.हिंगे यांनी मागितलेल्या 45000/- रुपयापैकी लाचेचा पहिला हप्ता म्हणुन दयावयाची 25000/- रुपये माझ्या बचतीतुन हजर केली. त्यात 500 रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अँन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या षर्टच्या डाव्या बाजुच्या खिषात ठेवली त्यानंतर मला व पंचांना सापळा कारवाई बाबत पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सुचना दिल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोना मोरे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना श्री. हिंगे थांबलेल्या ठिकाणी अहिंसा चौकात जावुन त्यांची भेट घेवुन 25,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी पायी 17.20 वा. सुमारास रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. अहिंसा चौक, अहिल्यानगर येथे श्री.हिंगे यांचे गाडीजवळ गेलो.त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातील लाच रक्कम 25000/- रुपये त्यांचे समोर धरुन मोजुन घ्या असे म्हणालो असता, श्री. हिंगे यांनी सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन हातात धरली.त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच रक्कम स्वीकारले बाबतचा डावा हात डोक्यावरुन फिरविण्याचा नियोजीत इषारा सापळा पथकास केला असता बाजुला उभे असलेले पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक सदर ठिकाणी आले व श्री. हिंगे यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले. पोना मोरे यांनी माझ्याकडुन व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी श्री. हिंगे यांना त्यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मकरंद गोरखनाथ हिंगे, वय-41 वर्षे, धंदा शिक्षक, जय बजरंग विदयालय, तपोवन रोड, अहिल्यानगर मु. वाळुंज पो. बाबुर्डी घुमट, ता.जि. अहिल्यानगर असे सांगितले.त्यानंतर श्री. हिंगे यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरषी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळल्याची खात्री झाली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी श्री. हिंगे यांना सोबत घेवुन पुढील कामाकाज कामी ते लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे आले. त्यांचे सुचनेप्रमाणे मी देखील तेथे हजर झालो. त्यावेळी पोनि श्रीमती देवरे मॅडम यांनी मला बाहेर थांबण्याचे सांगुन श्री. हिंगे यांच्या आवश्यक त्या तपासण्या केल्या.पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक यांनी त्यांचे त्या ठिकाणी पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 02/04/2025 रोजी 15.58 वा ते 16/47वा. दरम्यान हॉटेल रॉयल येथे लाच मागणी पडताळणीच्या वेळी व 17/20 ते 17/24 वा.दरम्यान अहिंसा चौक अहिल्यानगर येथे सापळा कारवाईच्या वेळी श्री.मकरंद हिंगे यांनी आमच्या संस्थेच्या नावाने, केलेल्या कामाचा खर्च म्हणून 9,99,888/-रूपयाचे बील मंजूर होवून मिळण्यासाठी वाळुंज ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती पार्वती गोरखनाथ हिंगे यांची ताबा पावतीवर सही करुन देण्याच्या मोबदल्यात 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 45,000/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेचा पहिला हप्ता म्हणुन 25,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री मकरंद गोरखनाथ हिंगे, वय-41 वर्षे, धंदा शिक्षक, जय बजरंग विदयालय, तपोवन रोड, अहिल्यानगर मु. वाळुंज पो. बाबुर्डी घुमट, ता.जि. अहिल्यानगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Pratap Pandurang Darade(I (Inspector)) / API **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Pratap Pandurang D
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API